# आनंद, गुजरात येथील प्रजासत्ताक दिन संचलनामध्ये महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलाची तुकडी सर्वोत्कृष्ट....

आनंद, गुजरात येथे, दि. २६ जानेवारी २०१७ रोजी प्रजासत्ताक दिनानिमीत्त आयोजीत संचलनामध्ये भाग घेवून महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलाच्या तुकडीने सर्वोत्कृष्ट संचलनासाठीचा प्रथम क्रमांकाचा चषक जिंकला आहे.

सहाय्यक समादेशक श्री भास्कर महाडीक रा. रा. पोलीस बल गट क्र. ८, यांचे मार्गदर्शनाखाली गट ८ मुंबई व गट ११ नवी मुंबई येथील मिळुन एकुण ३ अधिकारी व ३९ कर्मचा-यांच्या महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलाच्या तुकडीने भाग घेतला होता.

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८ यांचे मार्गदर्शनाखाली गट ८ मुंबई मुख्यालयामध्ये या तुकडीचा सराव करुन घेण्यात आला होता.

गतवर्षीही बेंगलुरु, कर्नाटक येथे आयोजीत प्रजासत्ताक दिन संचनलनामध्ये महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलाच्या तुकडीने सर्वोत्कृष्ट संचलनासाठीचा प्रथम क्रमांकाचा चषक जिंकला होता.

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलासाठी तसेच संपुर्ण महाराष्ट्र राज्य पोलीस दलासाठी अभिमानास्पद अशा या कामगिरीसाठी मा. अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई श्री संदीप बिश्नोई यांनी तसेच समादेशक रा रा पोलीस बल गट क्र. ८ मुंबई श्री महेश घुर्ये यांनी संचलनात भाग घेतलेल्या पोलीस अधीकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले असुन भविष्यातही अशीच कामगिरी राज्य राखीव पोलीस बलाकडून होत राहील यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

******





